| | | |
|---|---|---|
| | सहायक पोलीस आयुक्त, वाहतुक विभाग अमरावती शहर<br>ITI कॉलेज समोर, मोर्शी रोड, अम. फोन क्र. 0721- 2660330<br>E-mail- acptraffic.cpamt@mahapolice.gov.in | |

जा.क. सपोआ (वा)/प्रेस नोट /2025 दिनांक :- 15/02/2025

## प्रेस नोट

अमरावती शहर येथील वाहतुकीला शिस्त लावण्याकरीता वाहतुक विभागच्या वतीने सन 2024 मध्ये एकुण 5587 वाहन चालकां विरुध्द मोटार वाहन कायदयाप्रमाणे कारवाई करुन एकुण 52,89,400/- रुपये ची दंडात्मक कारवाई करण्यात आली असुन यामध्ये एकुण अनपेड चलान 4605 व त्यामध्ये अनपेड रक्कम 4364850/- ही मोठया प्रमाणात प्रलंबित आहे. पेड चलान व रकमेच्या तुलनेत अनपेड चलान व अनपेड रक्कम ही मोठया फरकेने असल्याने वाहतुक विभाग अमरावती शहर द्वारा आगामी काळात मोटर वाहन कायद्यान्वये प्रलंबीत ई चलान प्रकरणा मधील तडजोड रक्कम वसुली करीता विशेष मोहीम राबविण्यात येणार आहे. या दरम्यान वाहन धारकांना होणारा त्रास टाळण्याकरीता सर्व वाहन चालक/मालक यांना आवाहन करण्यात येते की आपण आपले वाहनावरील प्रलंबीत ई चलान Mahatraffic App किंवा https://mahatrafficechallan.gov.in या वेब साईटच्या लिंकवर जावुन आपले वाहनावर असलेल्या ई चलान बाबत पडताळणी करावी व तात्काळ तडजोड रक्कम ऑनलाईन किंवा शहर वाहतुक कार्यालय अमरावती येथे भरणा करुन पावती प्राप्त करावी. जे वाहन चालक/मालक हे आपले वाहनावरील प्रलंबीत चलान मधील तडजोड रक्कम भरणा करणार नाहीत अशा वाहन चालकां विरुध्द वाहतुक विभागा मार्फत पुढील काळात कायदेशीर कार्यवाही करण्याचे दृष्टीने पेंडींग ई चलान प्रकरणात मा.न्यायालयात मोठया प्रमाणात खटले दाखल करण्यात येणार आहेत.

सर्व वाहन चालक/मालक यांनी वरील प्रमाणे ॲपवर आपले वाहना वरील प्रलंबीत दंडाची माहीती प्राप्त करुन आप आपले वाहनावरील प्रलंबीत ई चलान तडजोड रक्कम नजीकच्या वाहतुक कार्यालय किंवा ऑनलाईन पोर्टलवर भरणा करुन वाहतुक विभागास आवश्यक सहकार्य करुन पुढील काळात दंडात्मक कारवाई टाळण्याकरीता वाहतुक नियमांचे पालन करावे.

अपघात व दंड टाळण्याकरीता वाहतुक विभाग अमरावती शहर च्या वतीने सर्व वाहन चालक/मालक यांना आवाहन करण्यात येते की सुरळीत व सुरक्षीत वाहतुक तसेच रस्ते सुरक्षा व अपघात टाळण्यासाठी वाहतुक नियमांचे काटेकोर पणे पालन करावे. वेग मर्यादेचे भान ठेवुन वाहन चालवावे, जिवन अमुल्य आहे, प्रत्येकाने आप आपल्या कामकाजाचा आराखडा तयार करुन वेळेचे योग्य नियोजन करावे. वाहन चालकाने वेळेचे नियोजन व वाहतुक नियमांचे पालन केल्यास अपघात व प्राण हानी टाळता येवु शकते ! तसेच वाहतुक नियमांचे भंगामुळे होणार कार्यवाही व आर्थीक नुकसान सुध्दा टाळता येते.

(संजय खताळे)
सहायक पोलीस आयुक्त
वाहतुक विभाग अमरावती शहर

प्रती :- मा.संपादक, --------------

सदर प्रेसनोट जनहितार्थ असल्याने आपले वर्तमान पत्रात प्रकाशित करुन सहकार्य करावे.